ISSN 2319-8648

Pre-Reviewed

UGC Approved Journal
Sr. No. 64310

Impact Factor - 2.143

Indexed (IIJIF)

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

**Special Issue**

**Issue I, Vol II 10th March 2018**

Godavari Manar Charitable Trust's

## Arts, Commerce & Science College, Shankarnagar

Tq. Biloli, Dist. Nanded

(NAAC Re-accredited 'B' Grade with CGPA 2.31 & ISO- 9001-2008)

### One Day Interdisciplinary National Conference
on

## Globalization and Welfare States: Problems and Prospects

Jointly Organized by
Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded
&
Public Administration Association Maharashtra

Organized by
Department of Public Administration
Arts, Commerce & Science College, Shankarnagar

Editor In Chief
Mr. Arun B. Godam
Latur.

Convener
Dr. B. S. Pimple
Principal, ACS College, Shankarnagar &
President, Public Administration Association Maharashtra

Co-Convener
Dr. S. K. Lekhane
(HOD Pub. Adm.)

Coordinator
Dr. A. C. Sonkamble
(Asso. Prof. Pub. Adm.)

www.rjournals.co.in

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue I Vol. II , 10th March. 2018
UGC Approved
Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

Late Ram... College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani


| | | | |
|---|---|---|---|
| 54 | जागतिकीकरणाचे सामाजिक दुष्परिणाम | प्रा.डॉ. अशोक काकासाहेब जाधव | 164 |
| 55 | जागतिकीकरण आणि सामाजिक न्याय | डॉ. संजय काळे | 167 |
| 56 | जागतिकीकरणाचा राज्यव्यस्थेवर व प्रशासनावर होणारा परिणाम | डॉ. रेखा ग. हिंगोले / माने | 170 |
| 57 | जागतिकीकरणाचा आरक्षण धोरणावरील परिणाम | प्रा.संजय कांबळे | 172 |
| 58 | जागतिकीकरण आणि भारतातील शिक्षण | प्रा. डॉ. वसंत पांडुरंग सरवदे | 176 |
| 59 | जागतिकीकरणाचा लोकप्रशासनावरील प्रभाव | डॉ.सी.एम.कहाळेकर<br>डॉ. एस. एन. कबाडी | 178 |
| 60 | जागतिकीकरण आणि आर्थिक विषमता | प्रा. डॉ. आनंद शिंदे | 181 |
| 61 | कल्याणकारी राज्यात समाजकल्याणाचे महत्व | प्रा.डॉ.एस.एस.शिंदे | 184 |
| 62 | जागतिकीकरण व सामाजिक न्याय | डॉ. डी. एल. बंजारा | 187 |
| 63 | जागतिकीकरणाचे नागरी समाजावर झालेले परिणाम - एक समाजशास्त्रीय अध्ययन. | डॉ.दत्ता मा. तंगलवाड | 190 |
| 64 | जागतिकीकरण,उच्च शिक्षण व सामाजिक न्याय | प्रा. डॉ. विलास तुळशीराम ठाकूर | 195 |
| 65 | जागतिकीकरण आणि आरक्षण धोरण | प्राचार्य डॉ.पिंपळे बी.एस.<br>प्रा.दीक्षित एस.डी. | 199 |
| 66 | समाज कल्याण प्रशासन व महिला कल्याण<br>विशेष संदर्भ राष्ट्रीय महिला धोरण-2016 | प्रा.विजय लक्ष्मण तरोडे | 202 |
| 67 | नोकरदार महिलांच्या समस्या | डॉ.व्यंकट विळेगावे ,<br>डॉ.नागनाथ कळबंडे | 205 |
| 68 | जागतिकीकरणाचा डिजिटल ग्रंथालयावरील प्रभाव | डॉ. विवेक विष्णुदास जाधव | 208 |
| 69 | जागतिकीकरण आणि सामाजिक न्याय | प्रा. राम थोरात<br>प्रा. वाघमारे एस.एन. | 210 |

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist.Parbhani

Special Issue
Issue I Vol. II , 10th March 2018 | CURRENT GLOBAL REVIEWER UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143

# जागतिकीकरणाचे सामाजिक दुष्परिणाम

प्रा.डॉ. अशोक काकासाहेब जाधव
लोकप्रशासन विभाग, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी

------------- (54) -------------

**प्रस्तावना :-**

दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक व्यापारात वाढ व्हावी असे अनेक देशांना वाटत होते. १९४७ मध्ये २३ देशांनी एकत्र येवून जकात व व्यापारा संबंधीच्या गॅट (General Agreement On Teriff & Trade) करारावर सहया केल्या. भारत गॅट कराराचा संस्थापक सदस्य होता. २३ सदस्य राष्ट्राच्या संख्येत वाढ होवून ते १९९४ मध्ये ११८ झाली. उरूग्वेच्या परिषदेत कृषी वित्त पुरवठा, विविध सेवांचा व्यापार आणि बौध्दीक मालमत्ता हक्क इ. प्रश्नाबाबत मतभेद झाले. बहुउद्देशिय व्यापार व्यवस्थेशी निगडीत रहावे म्हणून भारत व इतर विकसनशिल राष्ट्रांनी या प्रस्तावावर सहया केल्या. विकसीत देशानी जसे अमेरिका व युरोपीय संघानी त्यांच्या शेतकऱ्यांना कृषी विकासासाठी शेती उत्पादनाच्या जवळपास निम्मे अर्थसहाय्य दिले. त्यामुळे विकसनशिल राष्ट्रांना त्याची अधिक झळ बसली. कारण विकसीत देशातील कृषी माल जागतिक बाजारपेठेत कमी किमतीत मिळू लागला व गरीब राष्ट्रातील कृषी माल जशास तसा पडून राहू लागला. यामुळे भारतीय कृषी प्रधान समाजावर मोठे प्रतिकुल परिणाम दिसू लागले.

गुन्नार निर्डाल व रॉल प्रेबीशच्या मते, जागतिक व्यापारामुळे गरीब देशाच्या औद्योगिक विकासात बाधा निर्माण होते. जागतिक व्यापारामुळे श्रीमंत देश अधिक श्रीमंत व गरीब देश अधिक गरीब बनतात. सारांश रूपाने विचार केला तर असे दिसून येते की, जागतिकरीकरण हे केवळ देशाच्या आर्थिक विकासासाठी वापरली गेलेली व्यवस्था आहे. जागतिकीकरणा मध्ये शासनाने सामाजिक न्याय व विकास याकडे दुर्लक्ष केलेले आहे. जागतिकीकरणाच्या वातावरणात सामाजिक न्यायाकडे आतापर्यंत राजकीय व्यवस्थेने पुरेशे लक्ष दिलेले नाही. केवळ राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या नजरेतून धोरणे तयार केली गेली. समाजातील गरीबी, दारिद्रय, दलित व आदिवासींचे प्रश्न, स्त्रीयांना देण्यात येणारी दुय्यम दर्जाची वागणुक याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. बहुराष्ट्रीय कंपन्याच्या आगमनामुळे भारतातील सार्वजनिक क्षेत्र, लघु उद्योग, गृह उद्योग लोप पावली. शासनाने पारंपारीक लघु व गृह उद्योग क्षेत्रात गुंतवणूक करणे आवश्यक होते. परंतू ती मागील कालखंडात केली गेली नाही. जागतिकीकरणामुळे शासनाने खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या धोरणानुसार मोठया प्रमाणात नोकर कपात केली. सरकारी मालकीच्या अनेक उद्योगांचे खाजगीकरण केले ते उद्योग परकीय व देशातील भांडवलदार वर्गाला दिल्यामुळे सध्या एस.सी., एस.टी. व ओबीसीच्या नौकर विषयक आरक्षणावर मर्यादा आलेल्या आहेत.

खाजगीकरण हे जागतिकीकरणाचीच एक नांदी आहे. त्यामुळे सरकारी नोकरीतील आरक्षण कमी होत आहे. आरक्षणा मागील राज्य घटनेचा अपेक्षित उद्देश पुर्णत्वाला जाईलच याची आता शाश्वती देता येत नाही. खाजगीकरण उदारीकरणाच्या धोरणामुळे आरक्षण किती आहे हा प्रश्न निर्माण होतो. जागतिकीकरणाच्या आडून निर्गुंतवणुक केली जात असल्यामुळे नागरिकांच्या रोजगाराची जबाबदारी शासनाकडून नाकारली जात आहे. तसेच कालातंराने आरक्षण संपुष्टात येण्याची शक्यता बळावत आहे.

**सामाजिक न्याय व जागतिकीकरण**

कल्याणकारी राज्याच्या भूमिकेतून सामाजिक न्याय समताधिष्ठित समाज निर्मितीकडे जाणारा असला पाहिजे. सामाजिक न्याय म्हणजे शोषण विरहीत व समताधिष्ठित समाज निर्मिती होय. यामध्ये मागास व दिनदुबळया लोकांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रतिनिधीत्व, आरक्षण, विषमतेची वागणुक, अदिवासींचे जंगल व जमिनीवरील हक्क, त्यांना मुख्य प्रवाहात आणणे, स्त्रीयांना दिली जाणारी तुच्छ वागणुक, त्यांच्यावरील अत्याचार, बलात्कार, शोषण, हुंडाबळी, गरीबांचे पुनर्वसन व अन्न पुरवठा इ. बाबींचा समावेश होतो. यामध्ये समाज विघातक कृत्यास प्रतिबंध करणे व समाज पोषक बाबींना प्रोत्साहन देणे अपेक्षित असते. या शिवाय महत्वाचे म्हणजे समता, स्वातंत्र्य, आर्थिक, सामाजिक व राजकीय हक्क, व्यक्तींना शिक्षणाची समान संधी इ. सामाजिक न्यायाची उद्दिष्टे आहेत. सामाजिक न्यायाचे समान

Special Issue
CURRENT GLOBAL REVIEWER
Issue I Vol. II , 10th March 2018 | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist.Parbhani

प्रमाणात वितरण होणे आवश्यक असते. जसे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, नौकरी, आरोग्य सेवा व आरक्षण इत्यादींच्या समान वाटपाबाबत शासनाने कायदे केलेले आहेत. त्याची निपक्ष अंमलबजावणी होणे महत्वाचे ठरते. समाजातील दुर्बल घटक, गरीब व निराधार या सर्वांचा धोरणात्मक विचार होणे आवश्यक आहे.

परंतू जागतिकीकरणाच्या आडून विकासाच्या नावाने शासन व्यक्तीच्या वैयक्तिक मालकीची जमीन हस्तगत करीत आहेत. त्या विदेशी कंपन्यांना दिल्या जात आहेत. शिक्षणाचे खाजगीकरण करून समाजाला शिक्षणापासून वंचीत ठेवले जात आहे. भारतातील सार्वजनिक उपक्रम विदेशी कंपन्याना विकून रोजगार देण्याची जबाबदारी नाकारली जात आहे. त्यामुळे आरक्षण राहील किंवा नाही या बाबत प्रश्न चिन्ह निर्माण होते. मजुराची जागा यांत्रिक साधनाने घेतल्यामुळे बेरोजगारांच्या संख्येत भरमसाठ वाढ होत आहे. थोडक्यात शासनाने समाजवादाला तिलांजली दिलेली आहे.

**सामाजिक न्यायावरील दुष्परिणाम**

**१) स्थानिक उद्योगांचा ऱ्हास**

परकीय कंपन्यांना भारतीय अर्थ व्यवस्था खुली केल्यामुळे स्थानिक उद्योगांचा ऱ्हास झालेला आहे. भारत सरकारने स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन व आर्थिक मदत देणे आवश्यक होते. परंतू तसे प्रयत्न १९९० ते २०१० या कालखंडात झालेले नाहीत. म्हणूनच भारतीय बाजारपेठेत चिनी वस्तु प्रसिध्द झाल्या. तसेच देशी व विदेशी वस्तुंच्या किंमतीत मोठया प्रमाणात तफावत आहे. विदेशी वस्तु स्वस्त दरात मिळतात तर देशी वस्तु महाग मिळतात. त्यामुळे भारतीयांचा विदेशी वस्तुकडे कल अधिक असल्याचे दिसून येते. याचा समाजाच्या आर्थिक विकासावर प्रतिकुल परिणाम होत आहे. भारतीय पैसा बाहेर जात आहे.

**२) मक्तेदारीत वाढ**

जागतिकीकरणामुळे स्पर्धा वाढण्या ऐवजी व्यवसायातील मक्तेदारीत वाढ झालेली आहे. खाजगी क्षेत्रातील व्यवसायिक मक्तेदारी वाढल्यामुळे कामगारांची व नागरिकांची पिळवणूक होत आहे.

**३) लघु उद्योगांचा ऱ्हास**

खाजगीकरण व बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे गृह व लघु उद्योग नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे समाजाचा आर्थिक स्थर खालावत आहे. नोकरी देण्याचे शासन नाकारत आहे. त्यामुळे सामाजिक विकास धोक्याच्या वळणावर आलेला आहे. भारतीय सुशिक्षीत बेकारांना मुद्रा योजनेअंतर्गत कर्ज दिले जाते परंतू ते पुरेसे नाही. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या स्पर्धेमुळे वस्तु उत्पादन करणाऱ्या लघु उद्योगांना जागतिकीकरणाचे धोरण अनुकूल ठरत नसल्याचे दिसून येते.

**४) रोजगार निर्मितीत घट**

भारता सारख्या अधिक लोकसंख्येच्या देशात जागतिकीकरणामुळे बेकारी वाढण्यात भर पडलेली आहे. श्रम शक्तीत वाढ झालेली आहे. परंतू रोजगार निर्मितीत वाढ झालेली नाही. रोजगार पुरविणाऱ्या शेती क्षेत्राला अधिक प्रोत्साहन दिले जात नाही. शेती मालाला हमी भाव दिला जात नाही. एक प्रकारे भांडवलशाही विकास पध्दतीवर अधिक भर दिला जात आहे.

**५) नफ्याला अधिक महत्व**

जागतिकीकरणा संदर्भात आखलेल्या धोरणात आर्थिक नफेखोरीला अधिक महत्व दिले जात आहे. गरीब वर्गाला परवडतील अशा स्वरूपात शासनाने सेवा पुरविणे आवश्यक असते. उदा. विज पुरवठा व वित्त पुरवठा. परंतू शासन जागतिकीकरणाच्या आडून बऱ्याच सेवा आंतरराष्ट्रीय बाजार व्यवस्थेशी जोडून त्या खाजगी कंपन्याकडून पुरविल्या जात आहेत. खाजगी कंपन्या समाजहितापेक्षा स्व आर्थिक विकासाला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला अधिक सेवेचा लाभ घेता येत नाही. तसेच परदेशी बँकाकडून अधिक व्याज दराने कर्ज देवून समाजाचे आर्थिक शोषण केले जात आहे.

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue I Vol. II , 10th March 2018
UGC Approved
Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

६) **असमतोल विकास**

जागतिकीकरणामुळे अविकसीत व विकसनशिल देशाचा समतोल विकास साधला जात नाही. जेथे कच्चा माल व नैसर्गिक साधन संपत्ती अधिक आहे अशा ठिकाणीच उद्योग उभारले जातात. मात्र मागास भागात उद्योग उभारले जात नाहीत. याचा समाज विकासावर प्रतिकुल परिणाम होत आहे. दारिद्रयरेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांच्या जीवनात जागतिकीकरणाने कांहीही फरक पडलेला नाही.

सारांश, जागतिकीकरण हे भांडवलदाराचे कुरण झाल्याचे दिसून येते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत गरीबी व दारिद्रय दुर करून स्त्री व दुर्बल घटकांना समानतेची वागणुक मिळणे आवश्यक होते. परंतू जागतिकीकरणामुळे मोठ मोठया भांडवलदारांचाच उदय होत असल्याचे निष्पन्न होते. लोकशाहीत निवडणुक लढविणे व मतदान करण्याचे स्वातंत्र असते. तसे भांडवलशाहीत समानतेचे जीवन जगण्याचा अधिकार मिळणे अभिप्रेत आहे. परंतू सध्या उद्योगपती उघडपणे राजकारणात येवून राज्य व्यवस्थेद्वारा स्वतःच्या गरजे प्रमाणे धोरण ठरवित आहेत. त्यात समाज विकासाचा विचार केला जात नाही. उद्योगपतींना परदेशात उद्योग चालविण्यासाठी जे जे लागते ते शासनाकडून मिळविण्याचा प्रयत्न होत आहे. त्यांना कराच्या माध्यमातून उत्पन्न वाढवून सार्वजनिक हितासाठी पैसा खर्च करणारे सरकार नको आहे. समाज विकासासाठी शासनाने परकीय कर्ज काढावे व सामान्य नागरिकावर त्याचा बोजा टाकून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष करांच्याद्वारे परत केले जाते हे गेल्या अनेक वर्षापासून घडत आहे. यामुळे भारताच्या सामाजिक विकासात असमतोल दिसून येतो.

**संदर्भ सूची :-**

१) डॉ. रविंद्र शोभने - जागतिकीकरण, समाज आणि मराठी साहित्य, विजय प्रकाशन नागपूर.
२) प्रा.कराडे जगन- जागतिकीकरण व भारता समोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
३) डॉ.आनंद तेलतुम्बडे - सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
४) सच्चिदानंद सिन्हा - भू-मंडलीकरण चुनौतियाँ, अरूणोदय प्रकाशन, दिल्ली.
५) व्हि.आर. देवी - भ्रष्टाचार प्रवृत्ती की विकृती, साधना प्रकाशन, दिल्ली.
६) डॉ. एम. तेगमपुरे, डॉ. के. गडकर, प्रा. आर. वलसे, डॉ. एस. रणखांब - जागतिकीकरण आणि भारत, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
७) योजना, लोकराज्य.
८) दै. लोकसत्ता २५ डिसेंबर २०१५.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dis... ..bhani